वाहनांचे अवागमन प्रतिबंधीत करणेसाठी स्थानिक निवासी अभ्यागत वारंवार कामानिमित्त **पिंपरी** चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील घोषित कंन्टेन्मेन्ट झोन मधील क्षेत्रात प्रवेश करणारे यांना उद्देशून आदेश काढणे आवश्यक असलेबाबत माझी खात्री झाली असल्याने **पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालयाच्या कार्यक्षेत्रातील संबधित प्राधिकृत अधिकारी यांनी घोषित केलेल्या कंन्टेन्मेन्ट क्षेत्रासाठी आणि सदर आदेश लागु करण्यात आलेल्या कालावधीत घोषित केल्या जाणा-या नवीन कंन्टेन्मेंट क्षेत्रासाठी आदेश काढणे अत्यावश्यक असलेबाबत माझी खात्री झाली आहे.**

६. त्याअर्थी **मी रामनाथ पोकळे, अपर पोलीस आयुक्त, पिंपरी चिंचवड** तथा विशेष प्राधिकृत कार्यकारी दंडाधिकारी म्हणुन शासनाच्या दिनांक ०१.०४.१९७४ चे अधिसुचनेद्वारे प्राधिकृत अधिकारी म्हणुन फौजदारी दंड प्रक्रिया संहिता कलम १४४ (१) (३) अन्वये पिंपरी चिंचवड पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील घोषित कंन्टेन्मेन्ट झोन्स क्षेत्रासाठी फौजदारी प्रकिया संहिता कलम १४४ (१)(३) अन्वये मनाई आदेश परिच्छेद क्रमांक ५ मधील नमुद अधिसुचनांच्या अधीन राहुन **फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ कलम १४४ (१) (३) प्रमाणे दिनांक ०२.०९.२०२० चे ००:०१ ते दिनांक ३०.०९.२०२० चे २४:०० वा. पर्यंत जमावबंदी व वाहतुक मनाईचा आदेश लागु करीत आहे.**

७. **कंन्टेन्मेन्ट झोनमध्ये नागरिकांना व वाहनांना प्रवेशबंदी तसेच परिसरातुन बाहेर पडण्यास बंदी करण्यात येत आहे. -** कन्टेन्मेन्ट झोन मधील क्षेत्रात फक्त अत्यावश्यक बाबींसदर्भातील हालचालींना परवानगी राहील. सदर परिसरात सक्त परिमीती नियंत्रण राहील. वैदयकीय सेवा, अत्यावश्यक सेवा, अत्यावश्यक वस्तु पुरवठयाची साखळी कायम ठेवण्यासाठी आवश्यक वाहतुक वगळता कन्टेन्मेन्ट झोन मधुन नागरीकांना येणे जाणे करणेसाठी प्रतिबंध असेल. याबाबत आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालय यांच्या मार्गदर्शक सुचनानुसार सक्त अंमलबजावणी केली जाईल.

८. **संपुर्ण राज्यात खालील बाबींना मनाई असेल –**

i) शाळा, महाविदयालये, शैक्षणिक संस्था, प्रशिक्षण संस्था दि. ३०/०९/२०२० पर्यंत बंद राहतील. परंतु ऑनलाईन शिक्षण /दुरस्थ
शिक्षण यांना परवानगी राहील तसेच त्यांना प्रोत्साहन दिले जाईल.

ii) सर्व सिनेमागृहे, जलतरण तलाव, करमणुक केंद्रे, थिएटर्स (मॉल व मार्केट कॉम्प्लेक्स मधील देखील), बार आणि सभागृहे, असेंब्ली हॉल आणि तत्सम ठिकाणे बंद राहतील.

iii) केंद्रीय गृहविभागाने परवानगी दिलेल्या आंतरराष्ट्रीय हवाई प्रवासी वाहतुक वगळता इतर आंतरराष्ट्रीय हवाई प्रवासी वाहतुकीस मनाई राहील.

iv) मेट्रो रेल्वे सेवा बंद राहतील.

v) सर्व प्रकारचे सामाजिक/राजकीय/ क्रिडा/मनोरंजन/ शैक्षणिक/ सांस्कृतिक/ धार्मिक कार्यक्रम व इतर मेळावे यांना आणि मोठया संख्येने एकत्र जमण्यास बंदी राहील.

vi) सर्व धार्मिक स्थळे / प्रार्थना स्थळे नागरीक/ भाविकांसाठी बंद राहतील.

vii) रेस्टॉरंट व इतर आदरतिथ्य सेवा (वैद्यकिय, पोलीस, सरकारी कार्यालये, बस डेपो, रेल्वे स्टेशन, विमानतळ, अलगीकरण केंद्र याठिकाणीचे उपहारगृह चालू राहतील)

